# बृहन्मुंबई महानगरपालिका

## <u>जाहिर सुचना</u>

विषय- अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहीर सुचना.

सदर सुचनेद्वारे नोंदणीकृत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, के/पश्चिम विभागातील अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करणेकामी खालील अटीनुसार कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत इच्छुक अशासकीय संस्थांनी (एन.जी.ओ.) सहाय्यक आयुक्त, के/पश्चिम विभाग कार्यालय इमारत, पालीराम पथ, बी.ई.एस.टी. डेपोसमोर अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५८ यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या संस्थांनी खालील नमूद आवश्यक कागदपत्रांसहित दि. २१.०९.२०१९ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सिलबंद अर्ज अनुज्ञापन खाते, के/पश्चिम विभाग, पाचवा मजला येथे सिलबंद पेटीत टाकावे.

अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) संस्थांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कामांसाठी फक्त स्थानिक के/पश्चिम विभागातील अशासकीय संस्थांनी (धर्मदाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत संस्था) अर्ज करावेत.

२. दिनांक ऑक्टोबर २०१९ ते जानेवारी २०२० या ४ महिन्यांच्या कालावधीकरिता आवश्यकतेनुसार कामगार पुरविणे.

३. प्रतीदिन प्रती कामगार रू. ६०५.१९/- इतके वेतन + ४६% लेव्हीचे अधिदान परिपत्रक क्र. प्रकाअ/६४, दि. ३०.०४.२०११ च्या अटीच्या पूर्ततेनंतर (प्रतीपूर्ती स्वरूपात) करण्यात येईल.

४. के/पश्चिम विभागातील अधिका-यांच्या सुचनेनुसार रोजच्या कामाकरिता मागणी केल्याप्रमाणे (सकाळ/दुपार/रात्र) सुरळीतपणे विनाविलंब, सक्षम कामगा-यांचा पुरवठा करणे. सदर अटीचा भंग झाल्यास प्रपत्र ब प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५. पुरवठा केलेल्या कामगारांचा देयकाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिरक्षणानंतर विभागीय लेखा सांकेतांक २२०८००४०० या लेखाशिर्षातून संबंधित संस्थेला ई.सी.एस./एन.ई.एफ.टी. द्वारे अधिदान केले जाईल.

६. संस्थेने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या कामगारांना प्रत्येकी महिन्याच्या १० तारखेच्या आत दरमहा वेतनाचे अधिदान आरटीजीएस/एनईएफटी द्वारे करणे बंधनकारक राहिल. तसे न केल्यास संस्थेचे काम रद्द करून संस्था काळया यादीत टाकण्यात येईल. महानगरपालिकेकडून आरटीजीएस/एनईएफटी द्वारे अधिदान मिळाले नसले तरीही कामगारांना विहित अधिदान करणे बंधनकारक आहे. अन्यथा प्रपत्र ब प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.

७. बाल कामगारांचा पुरवठा करणे निषिध्द आहे व तसे केल्यास त्याची संपुर्णतः कायदेशीर जबाबदारी संबंधित अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचीच राहिल.

८. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशिल, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

९. अशासकीय संस्थेने ' वस्तु व सेवा कर ' अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक राहील.

१०. उपरोक्त अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरित्या काम न करणा-या अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचे कडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरीत थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त के/पश्चिम विभाग यांना राहतील.

११. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचे कडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून लॉटरी पध्दतीने पात्र अशासकीय संस्थेची निवड करण्यात येईल. उपरोक्त निकषामध्ये न बसणा-या संस्थाना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

लॉटरीची तारीख दि. २३.०९.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त के/पश्चिम विभाग**